सी डब्ल्यु सी आय २२०७०९
आरबीआय/२००९-१०/१०५
डीपीएस. सीओ. पीडी. क्र **१४७**/०२.१४.००३/२००९-१० २२ जुलै २००९.

सर्व सिस्टिम प्रोव्हायडर्स (व्हिसा/मास्टर कार्ड/अमेरिकन एक्सप्रेस),
सर्व अनुसूचित वाणिज्य बँका

महोदय,

**<u>विक्री बिंदुजवळ (पी ओ एस) रोख रक्कम काढणे</u>**

सध्या प्लास्टिक कार्डांचा उपयोग करुन रोकड रक्कम काढण्याची सुविधा ही केवळ ऑटोमॅटिक टेलर मशीन्समध्येच (एटीएम) उपलब्ध आहे. मे ३१, २००९ रोजी, एटीएम व पीओएसची देशातील संख्या अनुक्रमे ४४,८५७ व ४, ७० २३७ एवढी होती. निरनिराळ्या व्यापारी संस्थामधील पॉईंट ऑफ सेल (पीओएस) टर्मिनल्समध्ये डेबिट कार्डांचा उपयोग एकसारखा वाढतच आहे. असा प्लास्टिक पैसा वापरण्यामध्ये ग्राहकांची सोय वाढविण्यामधील पुढील पायरी म्हणून पाओएस टर्मिनल्सवर रोखे रक्कम काढण्यास परवानगी देण्याचे ठरविण्यात आले आहे. सुरुवातीस ही सुविधा भारतात दिल्या गेलेल्या सर्व डेबिट कार्डांसाठी रु १०००/- प्रति दिवस अशी उपलब्ध आहे.

२) ह्या सुविधेसाठी लागु अयलेल्या अटी जोडपत्र दिल्या आहेत.

३) ही सुविधा देऊ करण्यासाठी बँकांनी त्यांच्या संचालक मंडळाची मंजुरी घ्यावी संचालक मंडळाला सादर करावयाच्या प्रस्तावामध्ये ह्या उत्पादाची रुपरेषा, बँकेवरील जोखीम व तिचे निवारण करण्याचे उपाय समाविष्ट असावेत.

४) पेमेंट ॲण्ड सेटलमेंट सिस्टिम अधिनियम, २००७ (२००७ चा अधिनियम ५१) च्या कलम १८ खाली रिझर्व बँकेला दिल्या गेलेल्या अधिकाराचा वापर करुन हे परिपत्रक प्रसृत करण्यात आले आहे.

आपला,

(जी. पद्मनाभन)
मुख्य महाव्यवस्थापक

सोबत - वरील प्रमाणे

पी ओ एसवर रक्कम काढणे

**जोडपत्र**

**पॉईंट ऑफ सेल (पी ओ एस) वर रोख रक्कम काढण्यासाठी अटी**

१) ही सुविधा केवळ भारतात दिल्या गेलेल्या डेबिट कार्डांसाठी उपलब्ध आहे.

२) पी ओ एस टर्मिनल्सवर काढता येणाऱ्या रोख रकमेची मर्यादा रु १०००/- प्रतिदिन एवढी आहे.

३) योग्य ती काळजी घेऊन (ड्यु डिलिजन्स) बँकेने ठरविलेल्या कोणत्याही व्यापारी संस्थेमध्ये ही सुविधा उपलब्ध होऊ शकते.

४) कार्डधारकाने खरेदी केली असली किंवा नसली तरीही ही सुविधा उपलब्ध आहे.

५) मालाच्या खरेदीसह ही सुविधा घेतली गेल्यास मिळणाऱ्या पावतीमध्ये रोख काढलेली रक्कम वेगळी दर्शविली जाईल

६) ही सुविधा देऊ करणाऱ्या बँकांनी ग्राहक तक्रार निवारण यंत्रणा स्थापन करावी. ह्याबाबतच्या तक्रारी बँकिंग ऑबडसमन योजनेच्या अधिकार क्षेत्रात येतील.

७) ही सुविधा देऊ करणाऱ्या बँकांनी, त्यांच्या संचालक मंडळाची मंजुरी घेतल्या नंतर, बँकिंग रेग्युलेशन अधिनियम १९४९ च्या कलम २३ खाली, भारतीय रिझर्व बँकेच्या, डिपार्टमेंट आफ बँकिंग ऑपरेशन्स व डेवलपमेंट ह्यांचेकडून एकदाच परवानगी द्यावी. ( संचालक मंडळाचा ठराव/ मंजुरी सोबत जोडावी.)